## सेंट झेवियर स्कूलमध्ये इंग्रजी वक्तृत्व स्पर्धा उत्साहात

**श्रीरामपूर (प्रतिनिधी)–** सेंट इग्नेशियस लोयोला सणानिमित्त २० वी जिल्हास्तरीय इंग्रजी वक्तृत्व स्पर्धा सेंट झेवियर इंग्लिश मीडियम स्कूलमध्ये उत्साहात पार पाडली.

प्रा. गणेश शिंदे, प्राचार्या सि. रिना जॉर्ज, रेव्ह. फा. प्रकाश भालेराव, प्राचार्य फा. विक्रम शिणगारे, फा. ऑलविन के, फा. मॅथ्यू, फा. सतीश कदम, फा. ख्रिस्तोफर शेळके, फा. सचिन मन्तोडे, फा. फ्रान्सिस ओहोळ, फा. संजय पठारे, फा. रत्नाकर दुशिंग, सुरेश कांबळे, मीलाग्रीन कदम, मीनाक्षी ब्राह्मणे, आनंद पटेकर यांच्या हस्ते दीपप्रज्वलन कार्यक्रमास प्रारंभ झाला.

या वक्तृत्व स्पर्धेत जिल्ह्यातील २० शाळांनी सहभाग नोंदविला. प्रथम क्रमांक सेंट विवेकानंद हायस्कूल, अहिल्यानगर, द्वितीय सेंट झेवियर इंग्लिश मीडियम स्कूल, श्रीरामपूर, तृतीय ऑक्सिलियम इंग्लिश मीडियम स्कूल, अहिल्यानगर या शाळांनी पटकाविला. तसेच उत्तेजनार्थ माउंट लिटेरा झी स्कूल, अहिल्यानगर, समता इंटरनॅशनल स्कूल, कोपरगाव, न्यू इंग्लिश स्कूल, श्रीरामपूर, मॉडेल इंग्लिश स्कूल, श्रीरामपूर, दिव्य दया स्कूल, भोकर या शाळांनी मिळविली. सर्वोत्तम वक्ते म्हणून अमोघ पालसकर, सेंट विवेकानंद स्कूल, अहिल्यानगर (इंग्रजी माध्यम), महेक बालानी, सेंट झेवियर स्कूल, श्रीरामपूर (इंग्रजी माध्यम), यश मन्तोडे, ज्ञानमाता विद्यालय, संगमनेर (मराठी माध्यम), प्राची लाड, भि. रा. खटोड विद्यालय, श्रीरामपूर (मराठी माध्यम) या विद्यार्थ्यांनी पुरस्कार मिळविला. या स्पर्धेत फा. ऑलविन के., फा. सुनील गायकवाड, डॉ. प्रिया सारडा हे परिक्षक म्हणून लाभले होते. स्नेहा दळवी, अनुष्का अमोलिक, सारा दळवी, स्वरांगी डेरे, इजमा जहागीरदार, नीरज राऊत, अश्बा शेख, जय वाघमारे, संस्कृती सानप, प्रिन्स हिवाळे आणि सक्षम मंधाने या विद्यार्थ्यांनी सूत्रसंचालन केले. आभार आदिती भोसले हिने मानले.

## रासायनिक खतांच्या अतिवापराचा मानवी जीवनावर परिणाम

### नैसर्गिक शेती अभियानात शास्त्रज्ञ डॉ. बागवान यांचे पाचेगावात मार्गदर्शन

**पाचेगाव फाटा (वार्ताहर)–** सध्या आपल्या शेतीत रासायनिक खतांचा अतिवापर होत असल्याने शेतीसह मानवी जीवनावर मोठा परिणाम होऊन अनेक आजार जडत असल्याचे प्रतिपादन राहुरी महात्मा फुले कृषी विद्यापीठाचे शास्त्रज्ञ डॉ. इकबाल बागवान यांनी केले.




नेवासा तालुक्यातील पाचेगाव येथे राष्ट्रीय नैसर्गिक शेती अभियानात शेतकरी बचत गटांना मार्गदर्शन करताना ते बोलत होते.

डॉ. बागवान पुढे म्हणाले, शेतीत रासायनिक खताचा अतिवापर झाल्याने नैसर्गिक समतोल बिघडला. त्यात रासायनिक खताचा वापर झालेल्या शेतीत पावसाचे पाणी आपल्याच परिसरात म्हणजे आपले पाण्याचे असणारे स्रोतामध्ये (बोरवेल विहिरी) रासायनिक खताचे घटक उतरून मानवी जीवनावर परिणाम होऊन मोठे आजार उद्भवत आहेत. त्यामुळे भविष्यात आपल्याला नैसर्गिक शेतीवर भर द्यावा लागेल. तसेच नैसर्गिक शेतीचे महत्व व कार्यपद्धतीबद्दल सविस्तर माहिती बचत गटांच्या शेतकऱ्यांना दिली.

निसर्गाच्या वातावरणामध्ये कोणताही बदल न करता नैसर्गिक शेती काळाची गरज झाली आहे. गांडूळ खते, जीवामृत, बीजामृत याबद्दल मार्गदर्शन केले. हरित क्रांतीनंतर अन्नपुरवठा कमी होऊ लागल्याने रासायनिक खताचा वापर वाढला पण परत पन्नास वर्षांनी नैसर्गिक शेती करा असा सल्ला देण्याची वेळ आली असल्याचे प्रतिपादन दहीगावाने येथील कृषी विज्ञान केंद्राचे शास्त्रज्ञ श्री. बहिरट यांनी केले. तालुका कृषी अधिकारी धनंजय हिरवे यांनी नैसर्गिक शेतीचे महत्व व फायदे सांगीतले. शेती करताना नैसर्गिक पद्धतीचा अवलंब कसा करावा याची काही उदाहरणे देऊन नैसर्गिक शेतीचे महत्त्व शेतकऱ्यांना पटवून दिले.

प्रगतशील शेतकरी कृषिभूषण मोहन तुवर यांनी रासायनिक खते व औषधे यांचे मानवी आरोग्यावर होणारे दुष्परिणाम याबद्दल मार्गदर्शन करून शेतकरी बचतगटाच्या माध्यमातून गावात नैसर्गिकरित्या शेती करून चांगलं उत्पादन घेण्याचा आत्मविश्वास अधिकाऱ्यांना दिला.

यावेळी राहुरी कृषी विद्यापीठाचे शास्त्रज्ञ नितीन ओगले, सरपंच वामनराव तुवर, शेतकरी संघटनेचे हरिभाऊ तुवर, अशोक कारखान्याचे संचालक बाळासाहेब शिंदे, रंगनाथ पवार, विठ्ठल गोलेचा, शांताराम तुवर, शिवाजी तुवर, भाऊसाहेब तुवर, भास्कर शिंदे, अनिल भिसे, योगेश पवार, तुकाराम घोगरे, रमेश शिंदे, सुभाष आचपळे, पंढरीनाथ शिंदे, अशोक पवार, विक्रम तुवर, प्रभाशंकर, राजेंद्र कापसे, बाळासाहेब मतकर, संतोष साळुंके, ज्ञानेश्वर जाधव, बाबासाहेब शिंदे, अनिकेत तुवर, राहुल नांदे, धर्मा तुवर, भगवान मतकर,रंगनाथ कुचेकर, रोहित तुवर, कृषी सखी लता तुवर यांच्यासह उपकृषी अधिकारी सुनीता पुजारी, विलास जाधव, सहाय्यक कृषी अधिकारी वैभव वैराळ यांच्यासह बचत गटाचे शेतकरी उपस्थित होते. सहाय्यक कृषी अधिकारी विकास बाचकर यांनी सूत्रसंचालन केले. प्रास्ताविक मंडळ कृषी अधिकारी राम ढोकणे यांनी केले तर आभार सरपंच वामनराव तुवर यांनी मानले.

## कृषी यांत्रिकीकरणाच्या सहाय्याने बदलत्या हवामानावर मात करणे शक्य- डॉ. बनसोड



**राहुरी (तालुका प्रतिनिधी)–** शेतीमध्ये आव्हाने खूप आहेत. आजच्या काळात दिवसेंदिवस बदलत चाललेल्या हवामानाला तोंड देणे अवघड होत चालले आहे. परंतु शेतकरी बांधवांनी न डगमगता या आव्हानांचे रुपांतर संधीमध्ये करावे. कृषि यांत्रिकीकरणाच्या माध्यमातून जागतिक हवामान बदलावर आपण मात करू शकतो असे प्रतिपादन महात्मा फुले कृषि विद्यापीठातील कृषि अभियांत्रिकी महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. रवींद्र बनसोड यांनी केले आहे.

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर कृषि महाविद्यालय, हाळगाव येथे अखिल भारतीय समन्वयीत कृषि अवजारे व यंत्रे संशोधन प्रकल्प, महात्मा फुले कृषि विद्यापीठ, डॉ. अण्णासाहेब शिंदे कृषि अभियांत्रिकी व तंत्रज्ञान महाविद्यालय, राहुरी व कृषि महाविद्यालय, हाळगाव यांच्या संयुक्त विद्यमाने ऊस लागवड तंत्रज्ञान आणि यांत्रिकीकरण प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाच्या उद्घाटनप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. रवींद्र बनसोड बोलत होते. अध्यक्षस्थानी सहयोगी अधिष्ठाता डॉ. दत्तात्रय सोनवणे उपस्थित होते.

व्यासपीठावर अखिल भारतीय समन्वयीत कृषि अवजारे व यंत्रे संशोधन प्रकल्पाचे प्रमुख डॉ. तुळशीदास बास्टेवाड, जामखेडचे तालुका कृषि अधिकारी रवींद्र घुले, प्रगतशील शेतकरी डॉ. दीपक वाळूंजकर उपस्थित होते.

डॉ. दत्तात्रय सोनवणे म्हणाले, हे महाविद्यालय तंत्रज्ञानाचा प्रचार आणि प्रसार करण्यासाठी कटिबध्द आहे. शेतीला यांत्रिकीकरणाची जोड गरजेची असल्याने या उद्देशाने हे प्रशिक्षण आयोजित करण्यात आले आहे. विद्यापीठाने विकसित केलेले तंत्रज्ञान शेतकऱ्यांपर्यंत पोहोचविण्यासाठी हे महाविद्यालय विक्री केंद्र सुरु करणार आहे. यामध्ये बियाणे, जैविक खते, कीटकनाशके, सूक्ष्म अन्नद्रव्ये, विविध प्रकाशने या केंद्रावर उपलब्ध होतील, असे आश्वासन त्यांनी दिले.

प्रास्ताविक डॉ. तुळशीदास बास्टेवाड यांनी यांनी केले. रवींद्र घुले यांनी शासनाच्या शेतकऱ्यांसाठी उपलब्ध असलेल्या यांत्रिकीकरणाच्या विविध योजनांची माहिती दिली. डॉ. दीपक वाळूंजकर यांनी आभार मानले. तांत्रिक सत्रामध्ये शास्त्रज्ञ डॉ. तुळशीदास बास्टेवाड यांनी मफुकृवि विकसित आधुनिक कृषि अवजारे व यंत्रे, डॉ. अंबादास मेहेत्रे यांनी ऊस लागवड तंत्रज्ञान, डॉ. रविकिरण राठोड यांनी ऊस शेतीसाठी उपयुक्त यांत्रिकीकरण, प्रा. महेश पाचारणे यांनी ड्रोन-ऊस शेतीसाठी वरदान, डॉ. संजय भांगरे यांनी खोडवा ऊस व्यवस्थापनाकरीता उपयुक्त यांत्रिकीकरण, डॉ. अनिकेत गायकवाड यांनी सूक्ष्म अन्नद्रव फुले मायक्रो ग्रेड या विषयांवर मार्गदर्शन केले. शेतकरी प्रद्युम्न महाजन यांनी ड्रोनबाबत मार्गदर्शन करून फवारणीचे प्रात्यक्षिक दाखविल सूत्रसंचालन प्रा. महेश पाचारणे यांनी तर आभार डॉ. निकिता धाडगे यांनी मानले.

## महादजी शिंदे विद्यालयाच्यावतीने सायकल पर्यावरण रॅली

### धर्मवीरगडावर स्वच्छता, पर्यावरण व इतिहासप्रेमींचा जागर

**श्रीगोंदा (प्रतिनिधी)–** रयत शिक्षण संस्थेच्या महादजी शिंदे विद्यालय, श्रीगोंदा येथील महादजी शिंदे इको क्लब व कर्मवीर भाऊराव पाटील स्काऊट पथक यांच्या संयुक्त विद्यमान नागपंचमी सणाच्या सुट्टीच्या दिवशी सायकल पर्यावरण रॅलीचे आयोजन करण्यात आले.

श्रीगोंदा- धर्मवीरगड (पेडगाव)- श्रीगोंदा या मार्गावर रॅली यशस्वीरीत्या पार पडली. या रॅलीत विद्यालयातील ६५ स्काऊट विद्यार्थी व ५ स्काऊट मास्टर्स उत्साहाने सहभागी झाले होते. विद्यालयातील भगवान बोटे व नरेंद्र वाघमारे यांच्या हस्ते हिरवा झेंडा दाखवून सायकल हाईकची सुरूवात करण्यात आली. विद्यार्थ्यांसोबतच स्काऊट विभाग प्रमुख विकास लोखंडे, गुरुकुल विभाग प्रमुख बापू जाधव, इको क्लब प्रमुख सुरेश गायकवाड, सांस्कृतिक विभाग प्रमुख संदीप बिरंगळ आणि सांस्कृतिक प्रमुख कैलास उकिरडे हेही सायकलवरून सहभागी झाले. पर्यावरण वाचवा - जीवन वाचवा, स्वच्छ भारत-हरित भारत अशा घोषणा देत विद्यार्थ्यांनी एकाच रांगेत, शिस्तबद्धपणे सायकल चालवत धर्मवीरगड गाठला. तेथे त्यांनी शौर्यस्तंभाचे दर्शन घेतले. यानंतर विद्यार्थ्यांनी लक्ष्मीनारायण मंदिर व शौर्यस्तंभ परिसराची स्वच्छता करून सामाजिक बांधिलकीची जाणीव व्यक्त केली. कार्यक्रमाच्या शेवटी सर्व विद्यार्थ्यांनी पुन्हा सायकलवरून शिस्तबद्धपणे श्रीगोंद्याच्या दिशेने प्रस्थान केले. रॅलीचे सुयोग्य नियोजन फाळी प्रमुख संदीप बिरंगळ व शौर्य सांस्कृतिक प्रमुख कैलास उकिरडे यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेबद्दल इको क्लब प्रमुख सुरेश गायकवाड यांनी आभार मानले.




## बलात्काराच्या गुन्ह्यात निर्मळ पिंप्रीच्या आरोपीला आठ वर्षांची शिक्षा

**लोणी(वार्ताहर)–** राहाता तालुक्यातील निर्मळ पिंप्री येथील बलात्काराच्या गुन्ह्यातील आरोपीला राहाता विशेष सत्र न्यायालयाने आठ वर्षांची शिक्षा सुनावली न्यायमूर्ती गुप्ता यांनी हा महत्वपूर्ण निकाल दिला.

लोणी पोलीस स्टेशनमध्ये २०२१ ला गुन्हा रजिस्टर नंबर ४८/ २०२१ भादंवि कलम ३७६ ए,बी सह पोक्सो कलम ४ ,८ व १२ प्रमाणे आरोपी जालिंदर तुळशीराम वांगे ,वय ३८ वर्ष रा. याच्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला होता.सत्र न्यायालय राहाता यांनी पोक्सो कलम ८ प्रमाणे पाच वर्ष कारावास व १० हजार रुपये दंड तसेच पोक्सो कलम १२ प्रमाणे तीन वर्ष शिक्षा या गुन्ह्यात सुनावली. सदर गुन्ह्याचा तपास लोणी पोलीस स्टेशनचे तत्कालीन पोलिस उपनिरीक्षक नाना सूर्यवंशी यांनी केला असून सरकारी वकील म्हणून शासनातर्फेअँड.बी.डी. पानगव्हाणे यांनी बाजू मांडली. तसेच कोर्ट पैरवी म्हणून सहा.उपनिरीक्षक दिलीप बुगे यांनी काम पाहिले आहे.

अहिल्यानगरचे पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे,अपर पोलिस अधीक्षक सोमनाथ वाकचौरे,उपाधीक्षक शिरीष वमने,सपोनि कैलास वाघ यांच्या मार्गदर्शनाखाली ही कारवाई करण्यात आली.

## राहाता बाजार समितीत डाळिंबाची आवक वाढली

**राहाता (तालुका प्रतिनिधी)–** राहाता कृषी उत्पन्न बाजार समितीत गुरुवारी डाळिंबाची चांगली आवक झाली. डाळिंबाचे १२,०७५ कॅरेटची आवक झाली.

डाळिंबाला प्रति किलो डाळिंब नंबर १ ला २९६ रुपये ते जास्तीत जास्त २५५ रुपये भाव मिळाला. डाळिंब नंबर २ ला १०६ रुपये ते १९५ रुपये भाव मिळाला. डाळिंब नंबर ३ ला ५१ रुपये ते १०५ रुपये किलोला भाव मिळाला. तर डाळिंब नंबर ४ ला १० ते ५० रुपये भाव मिळाला.

राहाता बाजार समितीत डाळिंबाला चांगला भाव मिळत असल्याने आवक वाढली आहे. बाजार समितीत शेतकरी व व्यापाऱ्यांना पायाभूत सुविधा मिळत असल्याने शेतकऱ्यांचा विश्वास वाढला आहे. ना. राधाकृष्ण विखे पाटील आणि माजी खा. डॉ. सुजय विखे पाटील यांचे बाजार समितीवर नियंत्रण असल्याने कारभार चांगल्या पद्धतीने सुरू आहे.

पान १ वरुन

### सार्वमतची सहकार मंथन परिषद...

नवनवीन योजना राबविल्या जात आहेत. यामध्ये आयकर सवलती, डिजिटल तंत्रज्ञानाचा वापर, आणि प्राथमिक सहकारी संस्था दीडशेहून अधिक व्यवसाय करू शकतील, असा ऐतिहासिक निर्णय घेतला गेला आहे.

राज्यातील अनेक सहकारी पतसंस्था उत्तम कार्य करीत असून ग्रामीण अर्थव्यवस्थेला मजबूत करत आहेत. काकासाहेब कोयटे, सुरेश बाबळे यांचे नेतृत्व प्रेरणादायक आहे. ग्रामीण भागात रोजगार निर्मिती, उद्योगवाढ यासाठी पतसंस्था महत्त्वाची भूमिका बजावत आहेत. मी स्वतः पतसंस्थांबाबतचा विषय माजी केंद्रीय अर्थमंत्री प्रणव मुखर्जींकडे मांडला होता. अनेकवेळा या विषयासाठी मी पाठपुरावा केला आहे. भारत सरकारने याकडे गांभीर्याने लक्ष दिल्यास सहकारी पतसंस्था अधिक सक्षम होतील. बँकिंग रेग्युलेशन ॲक्टमध्ये झालेल्या बदलामुळे जिल्हा मध्यवर्ती बँका आता थेट रिझर्व्ह बँकेच्या नियंत्रणाखाली आल्या आहेत. यामुळे पारदर्शकता आणि जनतेचा विश्वास वाढणार आहे, असेही त्यांनी स्पष्ट केले.

सहकार ही केवळ आर्थिक चळवळ नाही, तर ही मानवी विकासाची शक्तिशाली संकल्पना आहे. वसंतदादा पाटील, वैकुंठ मेहता, डॉ. धनंजय गाडगीळ, यासारख्या नेत्यांच्या नेतृत्वाखाली सहकार क्षेत्राने अनेक ऐतिहासिक टप्पे पार केले. गुजरातमधील अमूलसारखा मॉडेल, इफको, कृभको या संस्थांचे योगदान भारताच्या ग्रामीण आर्थिक विकासात मोलाचे आहे. सहकार विद्यापीठ सुरू होणे ही देखील मोठी क्रांती असल्याचे त्यांनी सांगितले. यावेळी ना. विखे पाटील यांचा सत्कार सार्वमत-देशदूतचे वृत्तपत्र समूहाचे चेअरमन विक्रमा सारडा यांनी, आ. आशुतोष काळे आणि आ.विठ्ठलराव लंघे यांचा सत्कार संपादक अनंत पाटील यांनी, विवेक कोल्हे यांचा सत्कार दैनिक सार्वमत-देशदूतचे संचालक तथा सीईओ सुनील ठाकूर यांनी तर काका कोयटे यांचा सत्कार जाहिरात महाव्यवस्थापक अमोल घावरे यांनी केला.

### दत्ता भरणे नवे कृषिमंत्री...

आणि माणिकराव कोकाटे यांच्यात बैठक झाली. या बैठकीत कोकाटे यांचे कृषी खाते काढण्याचा निर्णय झाला. त्यानंतर पवार यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेऊन खाते बदलाबाबतचे पत्र दिले. या पत्रानुसार राष्ट्रवादीच्या मंत्र्यांमध्ये खांदेपालटाचा निर्णय झाला.

राज्य विधिमंडळाच्या पावसाळी अधिवेशनात कोकाटे यांची मोबाईलवर रमी खेळतानाची चित्रफीत व्हायरल झाली. या चित्रफितीमुळे कोकाटे यांच्या राजीनाम्याची मागणी करण्यात आली होती. मात्र, अजित पवार यांनी कोकाटे यांना कडक समज देऊन त्यांचे मंत्रिपद काढून घेण्याऐवजी खाते बदलण्याचा निर्णय घेतला. मुख्यमंत्री फडणवीस यांनी राष्ट्रवादीची विनंती मान्य करत हा बदल राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांना कळविला असल्याचे समजते. कृषि खात्याची सूत्रे हाती घेतल्यापासून वादग्रस्त विधानांमुळे माणिकराव कोकाटे टीकेचे धनी ठरले होते. त्यातच सभागृहात मोबाइलवर रमी खेळण्याचा व्हिडिओ समोर आल्याने कोकाटे यांच्यासह अजित पवार गटावरही विरोधकांकडून टीका होऊ लागली. कोकाटे यांनी त्यानंतरही मुक्ताफळे उधळत स्वतः वर टीका ओढवून घेतली होती. दरम्यान शिवसेना उद्धव ठाकरे गटाच्या शिष्टमंडळाने राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांना निवेदन देऊन वादग्रस्त मंत्र्यांना हटवावे, अशी मागणी केली होती. तसेच या प्रकरणानंतर मुख्यमंत्री फडणवीस यांनी मंत्रिमंडळ बैठकीत सर्व मंत्र्यांना वादापासून दूर राहण्याबाबत सक्त ताकीद दिली होती.

**कोकाटेंना निर्वाणीचा इशारा**

मी आणि सुनील तटकरे यांनी सांगूनही तुम्ही ऐकत नाही. याचा अर्थ तुम्हाला पक्षनेतृत्वाचाही धाक नाही, असा त्याचा अर्थ होतो. झाले ते खूप झाले. खरेतर तुमचे मंत्रिपदच काढायला हवे होते. पण आपले ज्येष्ठत्व लक्षात घेऊन आणि यापुढे आपण कुठलेही गैरवर्तन करणार नाही या अटीवर तुम्हाला तूर्त मंत्रिपदी ठेवतो. यापुढे काही चुकीचे आढळले तर मंत्रिपद काढावे लागेल, अशा कडक शब्दांत कोकाटेंना या बैठकीत सुनावण्यात आल्याचे समजते.

**मकरंद पाटील यांचा नकार**

दरम्यान, अजित पवार यांनी खाते बदलाबाबत मदत आणि पुनर्वसन मंत्री मकरंद जाधव-पाटील यांच्याकडे कृषि खाते देण्याबाबत विचारणा केली होती. मुख्यमंत्री फडणवीस सुद्धा जाधव-पाटील यांच्याकडे कृषि खाते देण्याबाबत अनुकूल होते. मात्र, मी नव्याने मंत्री झालो असून माझ्याकडील मदत आणि पुनर्वसन खाते समजून घेतले आहे. आता पुन्हा दुसरे खाते समजून घेण्यास वेळ जाईल. त्यामुळे तूर्त आहे तेच खातेच राहू द्या, अशी विनंती जाधव-पाटील केल्याचे समजते. त्यांच्या नकारामुळे अखेर दत्तात्रय भरणे यांना कृषी खाते देण्याचा निर्णय घेण्यात आला.

### फसवणूक करणाऱ्या कंपन्यांवर...

निवडणुका, प्रलंबित गुन्ह्यांचा निपटारा, तसेच आर्थिक व सायबर गुन्ह्यांच्या वाढत्या प्रमाणावर नियंत्रण या विषयांवर चर्चा करण्यात आली. या वेळी जिल्हा पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे, अपर पोलीस अधीक्षक वैभव कलुबर्मे, अपर पोलीस अधीक्षक (श्रीरामपूर) सोमनाथ वाकचौरे, सर्व उपविभागीय अधिकारी व पोलीस ठाण्यांचे प्रभारी अधिकारी उपस्थित होते. कराळे यांनी शेवगाव शेअर मार्केट, शिर्डी, राहाता येथील ग्रो मोअर, तसेच अहिल्यानगर, श्रीगोंदा, पारनेर तालुक्यातील इन्फिनिटी, सिस्पे यांसारख्या फसवणूक प्रकरणांच्या दाखल गुन्ह्यांच्या तपासाची माहिती आर्थिक गुन्हे शाखेकडून घेतली.

चांगला परतावा देण्याचे आमिष दाखवून अनेक नागरिकांची फसवणूक केली जात आहे. अनेक वेळा ही फसवणूक लक्षात येईपर्यंत संबंधित कंपनीचे संचालक पसार होतात. त्यामुळे पोलिसांनी आपल्या हद्दीत अशा कोणत्या संस्था कार्यरत आहेत, त्यांच्याकडून नागरिकांना कशा प्रकारे आमिष दाखवले जात आहे, याची वेळीच चौकशी करून आवश्यक असल्यास त्यांच्या विरोधात सुमोटो गुन्हा दाखल करावा, असे स्पष्ट निर्देश कराळे यांनी दिले. सायबर क्राईमचे प्रमाणही लक्षणीयरीत्या वाढत असून, नागरिकांमध्ये जनजागृती करणे आणि तपास प्रक्रियेला गती देण्यावरही भर देण्याचे आदेश त्यांनी दिले. गणेशोत्सव, दहीहंडी यांसारख्या सणांचे नियोजन तसेच आगामी निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर कायदा आणि सुव्यवस्थेचा आढावा घेऊन उपाययोजना करण्याचेही आदेश यावेळी देण्यात आले.

### २०११ पर्यंतच्या सरकारी...

सरकारने घेतला आहे. या निर्णयामुळे अनेक वर्षांपासून अनिश्चिततेत असलेल्या लाखो कुटुंबांना दिलासा मिळणार आहे. या सर्व कुटुंबांना कायदेशीररित्या आपल्या घरांचे मालक होण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.

### शेवगावचे डिवायएसपी पाटील...

कर्जत विभागाच्या उपअधीक्षकपदी प्रवीणचंद्र लोखंडे यांना नियुक्ती देण्यात आली आहे. ते पोलीस प्रशिक्षण केंद्र, खंडाळा येथे कार्यरत होते. दरम्यान, लोखंडे यांनी पोलीस निरीक्षक पदावर असताना अहिल्यानगर जिल्ह्यात नेवासा, कोपरगाव, कोतवाली पोलीस ठाण्यासह लाचलुचपत विभागाचे उपअधीक्षक म्हणून काम पाहिले आहे. त्यांना पदोन्नती मिळाल्यानंतर त्यांची बदली खंडाळा येथे झाली होती. ते पुन्हा जिल्ह्यात बदलून आले आहेत. शेवगाव विभागाचे उपअधीक्षक पाटील यांचा कार्यकाळ पूर्ण झाल्याने त्यांची बदली पैठण येथे करण्यात आली आहे. मात्र, त्यांच्या जागी अद्याप कोणालाही नियुक्ती देण्यात आलेले नाही. दरम्यान, अहिल्यानगर ग्रामीण व पोलीस अधीक्षक कार्यालयातील गृह विभागाचे उपअधीक्षकपद रिक्त असून तेथे अद्याप कोणाला नियुक्ती देण्यात आलेली नाही.

### साध्वी प्रज्ञा ठाकूरसह मालेगाव...

अंतरावर असलेल्या एका शहरात मशिदीजवळ उभ्या असलेल्या मोटारसायकलला बांधलेल्या स्फोटकाचा स्फोट झाला. यात सहा जणांचा मृत्यू झाला आणि १०० हून अधिक जण जखमी झाले होते, त्यामुळे या प्रकरणाची चौकशी करणाऱ्या राष्ट्रीय तपास संस्थेने (एनआयए) आरोपींना योग्य शिक्षा देण्याची मागणी केली होती. २०१८ मध्ये सुरू झालेल्या या घटनेच्या संदर्भात खटल्याची सुनावणी १९ एप्रिल २०२५ रोजी संपली. तेव्हा न्यायालयाने हा खटला निकालासाठी राखून ठेवला होता.

### आदिवासीबहुल आठ जिल्ह्यांमध्ये...

नंदुरबार आणि पालघर या प्रत्येक जिल्ह्यात अनुसूचित जातींसाठी १०%, अनुसूचित जमातींसाठी २२%, विमुक्त जाती (अ) साठी ३%, भटक्या जमाती (ब) साठी २.५%, भटक्या जमाती (क) साठी ३.५%, भटक्या जमाती (ड) साठी २%, विशेष मागास प्रवर्गासाठी २%, इतर मागास वर्गासाठी १५%, एसईबीसीसाठी ८%, ईडब्ल्यूएससाठी ८% आणि खुला प्रवर्गासाठी २४% आरक्षण विहित करण्यात आले आहे.

यवतमाळ जिल्हा : यवतमाळ जिल्ह्यामध्ये अनुसूचित जातींसाठी १२%, अनुसूचित जमातींसाठी १४%, विमुक्त जाती (अ) साठी ३%, भटक्या जमाती (ब) साठी २.५%, भटक्या जमाती (क) साठी ३.५%, भटक्या जमाती (ड) साठी २%, विशेष मागास प्रवर्गासाठी २%, इतर मागास वर्गासाठी १७%, एसईबीसीसाठी ८%, ईडब्ल्यूएससाठी ८% आणि खुला प्रवर्गासाठी २८% आरक्षण लागू करण्यात आले आहे.

चंद्रपूर जिल्हा : चंद्रपूर जिल्ह्यामध्ये अनुसूचित जातींसाठी १३%, अनुसूचित जमातींसाठी १५%, विमुक्त जाती (अ) साठी ३%, भटक्या जमाती (ब) साठी २.५%, भटक्या जमाती (क) साठी ३.५%, भटक्या जमाती (ड) साठी २%, विशेष मागास प्रवर्गासाठी २%, इतर मागास वर्गासाठी १९%, एसईबीसीसाठी ८%, ईडब्ल्यूएससाठी ८% आणि खुला प्रवर्गासाठी २४% आरक्षण विहित करण्यात आले आहे.

गडचिरोली जिल्हा : गडचिरोली जिल्ह्यामध्ये अनुसूचित जातींसाठी १२%, अनुसूचित जमातींसाठी २४%, विमुक्त जाती (अ) साठी २%, भटक्या जमाती (ब) साठी २%, भटक्या जमाती (क) साठी २%, भटक्या जमाती (ड) साठी २%, विशेष मागास प्रवर्गासाठी २%, इतर मागास वर्गासाठी १७%, एसईबीसीसाठी ८%, ईडब्ल्यूएससाठी ८% आणि खुला प्रवर्गासाठी २१% आरक्षण लागू करण्यात आले आहे.

रायगड जिल्हा : रायगड जिल्ह्यामध्ये अनुसूचित जातींसाठी १२%, अनुसूचित जमातींसाठी ९%, विमुक्त जाती (अ) साठी ३%, भटक्या जमाती (ब) साठी २.५%, भटक्या जमाती (क) साठी ३.५%, भटक्या जमाती (ड) साठी २%, विशेष मागास प्रवर्गासाठी २%, इतर मागास वर्गासाठी १९%, एसईबीसीसाठी १०%, ईडब्ल्यूएससाठी ९% आणि खुला प्रवर्गासाठी २८% आरक्षण विहित करण्यात आले आहे.